# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O. Office, Palghar

**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**


---

### प्रेसनोट दि.२७/०६/२०१८

### जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पालघर पोलीस दलाकडुन जिल्हयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन प्रत्येक वर्षी दि.२६ जुन रोजी साजरा केला जातो. अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधुन पालघर जिल्हयातील पोलीस दलात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी मा.श्री.मंजुनाथ सिंगे, जिल्हा पोलीस अधीक्षक पालघर यांचे संकल्पनेतुन सर्व पोलीस ठाणे हद्दीत तसेच पोलीस मुख्यालय पालघर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पालघर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधुन शाळा, कॉलेज तसेच महाविद्यालये या ठिकाणी चर्चासत्र तसेच रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता मा.श्री.मंजुनाथ सिंगे पोलीस अधिक्षक पालघर, मा.श्री.राजतिलक रौशन अपर पोलीस अधीक्षक वसई, मा.श्री.योगेश चव्हाण अपर पोलीस अधीक्षक, पालघर तसेच सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला.